गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १०७ वा | रविवार ०३ सप्टेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 107 | Date : 03 /09/2023 | blow : Sunday | Page 4 | Price 4

## राज्यात पावसाचं 'कमबॅक'!
### पुढील चार दिवस पुण्यासाठी येलो अलर्ट

पुणे : पुणे मुंबईसह राज्यात पुढील चार दिवस पावसाचा अंदाज हवामान खात्याने दर्शवला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये येलो अलर्टदेखील जाही करण्यात आला आहे. मुंबई, पुण्यात पावसाने मोठ्या ब्रेकनंतर काल रात्रीपासून पावसाने



कमबॅक केला होतं. मुंबईतील अनेक भागात पाऊस पडला तर पुणे आणि पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातही पावसाने चांगलीच हजेरी लावली. शिवाय लोणावळ्यातदेखील पावसाने जोर धरला आहे. मात्र आता पुढील चार दिवस राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता असल्याचा इशारा हवामान खात्याने दिल्याने शेतकऱ्यांची काही प्रमाणात चिंता मिटण्याची शक्यता आहे. कमी दाबाचा पट्टा विदर्भापासून कर्नाटकपर्यंत जात आहे. त्याचप्रमाणे ३ सप्टेंबरला उत्तर बंगालच्या उपसागरामध्ये वाऱ्याची चक्रिय स्थिती तयार होण्याची शक्यता आहे. त्याच ठिकाणी येत्या ४८ तासांत कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची देखील शक्यता आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात ४ सप्टेंबरनंतर मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकण, गोवा आणि मध्यमहाराष्ट्रात आज आणि उद्या मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याच प्रमाणे संपूर्ण राज्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. ३ आणि ४ सप्टेंबरला मध्यमहाराष्ट्रात आणि ४, ५ सप्टेंबरला मराठवाड्यात तर ५, ६ सप्टेंबरला विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे या सगळ्या विभागात येलो अलर्ट जारी करण्यात आला असल्याचं हवामान खात्याने दिला आहे.

# शाब्बास..! आदित्य एल१ चे प्रक्षेपण, भारताचा सूर्याच्या दिशेने प्रवास सुरु



श्रीहरिकोटा : भारताच्या सूर्य मोहिमेचं प्रक्षेपण करण्यात आले आहे. सतीश धवन अवकाश केंद्रातून पीएसएलव्ही रॉकेटच्या साहाय्याने भारताचे आदित्य (Aditya L1) यान सूर्याच्या दिशेने झेपावले आहे. सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी या यानाचे प्रक्षेपण करण्यात आले. हे प्रक्षेपण पाहण्यासाठी सतीश धवन अवकाश केंद्रात लोकांनी बरीच गर्दी जमली होती. इस्रोच्या या मोहिमेमुळे आता भारताला सूर्याचा अभ्यास करणं सहज शक्य होणार आहे.

आदित्य यान पाच टप्प्यांमध्ये सूर्याचा प्रवास करणार आहे. पीएसएसव्ही रॉकेटच्या माध्यमातून हे यान पृथ्वीच्या खालच्या कक्षेत प्रस्थापित करण्यात येणार आहे. त्यानंतर हे यान पृथ्वीच्या कक्षेतच फिरणार आहे. दुसऱ्या टप्प्यात हे यान पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या बाहेर काढण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात या यानाचा सूर्याच्या । पान २ वर

## आदित्य एल१ 'हे वैज्ञानिकांच्या अथक प्रयत्नांचं यश' : पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया



भारत : भारताची सूर्य मोहीम आदित्य एल-१ यशस्वीरित्या प्रक्षेपित करण्यात आली आहे. भारताच्या पहिल्या सौर मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रोचे शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी ट्वीट करत प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी म्हटलं आहे की, चांद्रयान-३ च्या यशानंतर भारताने पुन्हा एकदा आपला अंतराळातील प्रवास सुरु केला आहे. पुढे बोलताना पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे की, संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी आमचे अथक प्रयत्न हे सुरुच राहतील. चांद्रयानाच्या नंतर भारताने आणखी एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. यासाठी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील इस्रोचे अभिनंदन केले आहे. यावेळी त्यांनी म्हटलं आहे की, आपल्या शास्त्रज्ञांनी वेळोवेळी आपले सामर्थ्य सिद्ध केलं आहे. भारताचे पहिले सौर मिशन आदित्य ङ१ चे यशस्वी प्रक्षेपण केल्याबद्दल देशाला अभिमान आणि आनंद आहे. इस्रोच्या संपूर्ण टीमचे या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी अभिनंदन. अमृत महोत्सवीवर्षात आत्मनिर्भर भारत बनवण्याच्या दृष्टीने अंतराळ क्षेत्रातील हे महत्त्वाचं पाऊल आहे. सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी सतीश धवन अवकाश केंद्रातून आदित्य एल१ चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. यानंतर संपूर्ण भारतात जल्लोष करण्यात आला. सतीश धवन अवकाश केंद्रात मोठ्या प्रमाणात लोकांची देखील गर्दी जमली होती. यावेळी 'भारत माता की जय' या घोषणा देखील देण्यात आल्या. त्यानंतर संपूर्ण देशभरातून इस्रोच्या या कामगिरीचं कौतुक केलं जात आहे.

## एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत

सोलापूर/प्रतिनिधीः एकात्मिक फलोत्पादन विकाय कार्यक्रम या योजनेसाठी काढणीपश्चात व्यवस्थापण घटकांतर्गत जिल्हयास शितगृह कोल्ड स्टोरेज या घटकास रक्कम १ कोटी २० लाख इतका कार्यक्रम राबविण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. या घटकांतर्गत खर्चाच्या ३५ टक्के अनुदान अदा करण्यात येते. शितगृहाचे ३ प्रकार असुन ते खालील प्रमाणे आहेत.

१. घटकः- नवीन शीतगृह युनिट प्रकार-१( एक सारख्या तापमानात राहणाऱ्या उत्पादनासाठी) प्रति चेंबर २५० टन पेक्षा जास्त. मापदंड आठ हजार रुपये प्रति मेट्रिक टन, कमाल मर्यादा ५००० मेट्रिक टन प्रति लाभार्थी, अनुदान खर्चाच्या ३५ टक्के जास्तीत जास्त ५० लाख रुपये.

२. घटकः-शितगृह युनिट प्रकार-२ (एकापेक्षा अधिक उत्पादने व तापमानासाठी ) (प्रति चेंबर २५० टन पेक्षा जास्त) कमीत कमी ६ चेंबर्स पेक्षा जास्त (प्रति चेंबर २५० टन पेक्षा कमी). मापदंड दहा हजार रुपये प्रति मेट्रिक टन. कमाल मर्यादा ५००० मेट्रिक टन प्रति लाभार्थी, अनुदान खर्चाच्या ३५ टक्के जास्तीत जास्त ५० लाख रुपये.३. घटकः- शितगृह युनिट प्रकार-३ (नियंत्रित वातारवणासाठी नविन तंत्रज्ञान राबविणे), मापदंड दहा हजार रुपये प्रति मेट्रिक टन. कमाल मर्यादा ५००० मेट्रिक टन प्रति लाभार्थी, अनुदान खर्चाच्या ३५ टक्के जास्तीत जास्त ५० लाख रुपये. तरी जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती । पान २ वर

## मुंबईच्या आदेशाने आंदोलकांवर लाठीमार; शरद पवारांचा सरकारवर गंभीर आरोप

जालना : येथील घटना गंभीर आहे. संकटात असलेल्या लोकांना दिलासा देण्याची गरज आहे. हवा तसा बळाचा वापर जालना येथील घटनेत करण्यात आला. आंदोलनात काही मार्ग निघेल याची चर्चा सुरू होती, सर्व व्यवस्थित सुरू असताना पोलिसांना सूचना आल्या आणि पोलिसांनी निर्णय बदलून सरळ सरळ बळाचा वापर करत लाठी हल्ला केला. मुंबईहून आदेश आल्यावर पोलिसांकडून बळाचा वापर करण्यात आला असल्याचा गंभीर आरोप शरद पवार यांनी केला आहे.

जालना येथे घडलेला प्रकार अतिशय गंभीर आहे. हा प्रकार जालना जिल्ह्यापुरता मर्यादित न रहाता इतर ठिकाणी पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज आम्ही तिघांनी इथे हॉस्पिटल मध्ये जाऊन भेट दिली, जखमी लोकांना भेटलो. आश्चर्य वाटेल असा बळाचा वापर या ठिकाणी करण्यात आला. स्त्रिया लहान मुले यांना सुद्धा पाहिले नाही. आंदोलनात काही मार्ग निघेल याची चर्चा सुरू होती, सर्व व्यवस्थित सुरू



असताना पोलिसांना सूचना आल्या आणि पोलिसांनी निर्णय बदलून सरळ सरळ बळाचा वापर करत लाठीहल्ला केला. हवेत गोळीबार करून ज्वारीच्या साईजचे छरे जखमींना लागले होते. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारच्या काळात, त्या मंत्रिमंडळात आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता, असेही शरद पवार म्हणाले.

आंदोलन शांततेने व्हावं कायदा हातात घेण्याचे काम कोणी करू नये. चर्चा सुरू असताना एकदम लाठीहल्ला केला, त्यानंतर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या असतील तर त्याची जबाबदारी ज्यांनी निर्णय घेतला त्यांची आहे. जखमी लोक आणि आंदोलकांनी सांगितले की, पोलिसांना वरून आदेश देण्यात आले. पोलिसांवर हल्ला झाला नाही, पोलिसांकडून हल्ला झाला. मात्र यात । पान २ वर

# केंद्र शासनाकडून सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब क्लस्टरसाठी २४७ कोटीचा निधी मंजूर

### फलोत्पादन समुह विकास योजनेंतर्गत प्रायोगिक तत्वावर राज्यातील द्राक्ष क्लस्टर नाशिक व डाळिंब क्लस्टर सोलापूर ची निवड

सोलापूर/प्रतिनिधी : भारतीय फलोत्पादन क्षेत्राची जागतीक, देशांतर्गत आणि निर्यात बाजारपेठेत स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी, उत्पादनाच्या कापनीनंतर हाताळणी, मूल्यवर्धन आणि बाजार जोडणी या करिता पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरीता, निवडलेल्या पिक समुहामध्ये स्पर्धा वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व पध्दतीचा वापर करण्याकरीता आणि जागतीक मुल्यसाखळीत भागधारकांना सामिल करुन घेण्यासाठी केंद्र शासनाच्या कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने फलोत्पादन क्लस्टर विकासाचा नविन कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब क्लस्टर साठी २४७.६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी दिली आहे.

भारत हा जागतिक स्तरावर फलोत्पादन पिकाचा सर्वात मोठा उत्पादक असून फळे आणि भाजीपाला जागतिक उत्पादनात १० टक्केपेक्षा जास्त वाटा आहे. सन २०१९-२० या वर्षात देशाने २५.६६ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावर ३२०.७७ दशलक्ष टन आतापर्यंतचे सर्वोच्च उत्पादन नोंदविले आहे, परंतु निर्यातीमध्ये १.७ % भाजीपाला व ०.५ % फळपिके इतका वाटा आहे. जो इतर देशांपेक्षा अत्यंत कमी आहे. केंद्र शासनाच्या कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने देशातून ५५ फलोत्पादन समुह निवडले असून त्यापैकी १२ समुह, फलोत्पादन समुह विकास योजनेंतर्गत प्रायोगिक तत्वावर निवडलें आहेत. त्यापैकी २ फलोत्पादन समुह महाराष्ट्रातून निवडले असून त्यामध्ये द्राक्ष क्लस्टर नाशिक व डाळिंब क्लस्टर सोलापूर चा समावेश आहे.

सोलापूर डाळिंब क्लस्टरला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्यासाठी पूर्व उत्पादन उत्पादन, - काढणीनंतरचे व्यवस्थापन व मुल्यवर्धन आणि लॉजिस्टिक्स, विपणन व ब्रेडिंग यासह संपुर्ण मुल्य शृंखलेच्या तीन्ही अनुलंब (तशींळलरश्र) विकासाचा समावेश केलेला आहे. केंद्र शासन स्तरावरील । पान २ वर

**केंद्र शासनाने देशातुन प्रायोगिक तत्वावर निवडलेल्या १२ समुह विकास कार्यक्रमापैकी द्राक्ष क्लस्टर नाशिक व डाळिंब क्लस्टर सोलापूर या दोन क्लस्टरची महाराष्ट्रातून निवड केलेली आहे. सोलापूर डाळिंब क्लस्टर करिता मे. बी. व्ही.जी. ग्लोबल फार्म वर्क्स लि. सोलापूर या संस्थेची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून निवड झालेली आहे. त्यामुळे डाळिंब उत्पादक शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञान व पायाभुत सुविधा उपलब्ध होणार असून त्याद्वारे भविष्यात डाळिंब निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा वृध्दिंगत होण्यास मदत होईल.**
**- डॉ. के.पी.मोते, संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे**

## सकल मराठा समाज सोलापूर जिल्ह्याचे वतीने रविवारी जिल्हाभर रास्ता रोको आंदोलन

सोलापूर/प्रतिनिधीः सकल मराठा समाज सोलापूर जिल्ह्याच्या वतीने जालना जिल्ह्यातील मराठा आंदोलकावर सरकार पुरस्कृत अमानुषपणे केलेल्या लाटी हल्ल्याच्या निषेधार्थ संपूर्ण जिल्हापर प्रत्येक तालुक्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग रविवारी दिनांक ३ सप्टेंबर सकाळी दहा ते अकरा एक तास बंद करून सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्याचे ठरले आहे. त्याप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यातील मराठा समाजातील तरुणांनी रस्त्यावर उतरून आंदोलन करून सरकारचा निषेध करावा.

हा सरकार पुरस्कृत भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी सोलापूर शहर, करमाळा, माढा, मोहोळ, सांगोला, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, या ठिकाणी हम रस्त्यावर त्या त्या तालुक्यातील लोकांनी रस्ता रोको करून सरकारचा जाहीर निषेध करायचा आहे. जालना येथे आंदोलन शांततेच्या मार्गाने मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून आमरण उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी जमलेल्या तमाम अबाल वृद्ध, महिला, पुरुष, लहान मुले, यांच्यावर अमानुषपणे लाठी हल्ला करण्यात आला हा हल्ला पूर्वतयारी करून पोलिसांनी घडवून आणला.

कारण ग्रामस्थ शांततेच्या मार्गाने आंदोलन स्थळी बसले असताना. पोलीस कर्मचारी मात्र फौज फाटा घेऊन दंगली प्रमाणे हेल्मेट व संरक्षक जाळी घेऊन आंदोलन स्थळी जातात. याचाच अर्थ पोलिसांनी जाणून-बुजून हा हल्ला केला आहे.

त्याचा जाहीर निषेध समाजाच्या वतीने होत आहे. तरी सर्व मराठा व मराठा आरक्षणाला पाठिंबा दर्शवणाऱ्या तसेच सरकार विरोधी तमाम नागरिकांनी या रास्ता रोको मध्ये सामील होऊन सरकारचा निषेध करावा असे आवाहन सकल मराठा समाज सोलापूर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठा समाजावर हल्ला प्रकरणी अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावर रास्ता रोको करून तीव्र निषेध व्यक्त

अक्कलकोट/प्रतिनिधी : सकल मराठा समाज, मराठा संघटन अक्कलकोट शहर तालुक्याच्या वतीने अंतरावली सराटी तालुका अंबड, जिल्हा जालना या ठिकाणी पोलिसांनी आंदोलन कार्त्यावर केलेल्या अमानुष लाठी हल्ला व गोळीबार करून जगाला आंदोलनाची दिशा देणाऱ्या मराठा समाजावर हल्ला केल्याबद्दल अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावर रास्ता रोको करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी तहसीलदार बाळासाहेब सिरसाट यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी हे उपस्थित होते.

दरम्यान रास्ता रोको मुळे दुतर्फा वाहनाची रांग लागलेली होती या चक्का जाम आंदोलनात मराठा समाज



शेकडोच्या संख्येने उपस्थित होता.अंतरावली येथील घटनेत मनोज जरांगे पाटील रीतसर मार्गाने बेमुदत आमरण उपोषण सुरु असताना सदरचे उपोषण उधळून लावण्यासाठी पोलिसांचा प्रचंड मोठा फौज फाटा घेऊन सदरचे आंदोलन चिरडून काढण्यासाठी समाजातील महिला, लहान मुले, वृद्ध व तरुणांवर लाठी हल्ला व गोळीबार करून जगाला आंदोलनाची दिशा देणाऱ्या मराठा समाजावर हल्ला करण्यात आला. याबद्दल अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावर रास्ता रोको करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आले. या पुढील काळात जिल्हा सकल मराठा समाजाकडून जी आंदोलनाची दिशा ठरविली जाईल त्या पद्दतीने सकल मराठा समाज, मराठा संघटन अक्कलकोट शहर तालुक्याच्या वतीने आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे आंदोलन कर्त्यांनी सांगितले.

या प्रसंगी विविध जणांनी मनोगतातून भ्याड हल्ल्याचा तिखट शब्दात निषेध व्यक्त केले. या वेळी आंदोलन कर्त्यांची माजी राज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अशपाकभाई बळ्ळोरगी, मल्लिकार्जुन पाटील यांनी भेट घेतली.

या आंदोलनाच्या वेळी समाजाचे जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी, अमोलराजे भोसले, महेश इंगळे, बाबासाहेब निंबाळकर, मनोज निकम, गोटू माने, बाळासाहेब मोरे, तम्मा शेळके, राजाभाऊ नवले, शितल जाधव, रवी कदम, प्रवीण घाडगे,। पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

## संपादकीय

### चिंता व्यक्त केली जात आहे..

जगाची ४१.५ टक्के लोकसंख्या असलेल्या या राष्ट्रगटामध्ये येण्यास अनेक देश इच्छुक होते आणि आहेत. 'ब्रिक्स'च्या या विस्ताराचा परिणाम जागतिक राजकारणावर होण्याची शक्यता आहे. दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे अलीकडे झालेल्या 'ब्रिक्स'च्या शिखर परिषदेत सदस्य असलेले भारत, रशिया, चीन, ब्राझिल आणि दक्षिण आफ्रिका हे पाच देश सहभागी झाले होते. या परिषदेत सदस्य असलेल्या चार देशांचे म्हणजेच चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, दक्षिण आफ्रिकेचे सिरिल रामाफोसा, ब्राझीलचे लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते, मात्र, युक्रेनमधील कथित युद्ध गुन्ह्यांबद्दल आंतरराष्ट्रीय अटक वॉरंटचा सामना करणारे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन उपस्थित राहिले नाहीत. 'ब्रिक्स' या राष्ट्रगटामध्ये येण्यासाठी अनेक देश इच्छुक का आहेत, याचा विचार करताना दोन प्रमुख मुद्दे दिसतात. एक म्हणजे जगभरात अमेरिकेच्या विरोधातील भावना तयार होत आहे आणि अशा परिस्थितीत सर्व देश असा एक गट शोधत आहेत; ज्यांच्यामध्ये अशीच भावना एकत्र येण्यासाठी कारणीभूत असेल. दुसरे असे की, ग्लोबल साऊथ देश त्यांचे ऐक्य सिद्ध करू शकतील अशा बहुध्रुवीय गटाची नितांत आवश्यकता निर्माण झाली होती. 'ब्रिक्स'मध्ये अन्य राष्ट्रांना सामावून घेण्याची मागणी चीनने लावून धरली होती आणि त्या मागणीला रशियाचाही पाठिंबा होता. 'ब्रिक्स' ही अमेरिकेच्या विरोधी परिषद व्हावी, असा या दोन देशांचा प्रयत्न असून भारताला मात्र, ही परिषद कोणत्याही राष्ट्राच्या विरोधात असावी, असे वाटत नाही. अमेरिका आणि भारताचे मित्रत्वाचे संबंधही त्याला कारणीभूत आहेत, पण चीनची वाढती जागतिक महत्त्वाकांक्षा त्याला खोडा घालू शकते. 'ब्रिक्स' गटाच्या राष्ट्रप्रमुखांनी गेल्याच आठवड्यात झालेल्या परिषदेत अर्जेंटिना, इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या सहा देशांचा 'ब्रिक्स'मध्ये समावेश करण्याचा निर्णय घेतला. 'ब्रिक्स'ला अमेरिकाविरोधी व्यासपीठ बनवण्यात चीनला रस आहे. त्यामुळे आता विस्तार झाल्यानंतर 'ब्रिक्स' चीनच्या मुठीत जाणार नाही, यासाठी भारताला सतर्क राहावे लागणार आहे. 'ब्रिक्स'मध्ये सहभागी झालेल्या नव्या सदस्यांकडे भारत विकसनशील भागीदार म्हणून पाहत असला तरी हा गट चीनचा समर्थक बनू शकतो आणि त्यामुळे भारताचा आवाज आंतरराष्ट्रीय पातळीवर क्षीण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

## शिक्षक दिन कुणाचा ?

गांडू भडवे रण चढे, मर्दों के बेहाल.पतिव्रता भूखन मरे,पेढे खाये छिनाल. असा संत कबीरदासांचा एक अतिशय सुंदर आणि वास्तववाद दर्शविणारा दोहा प्रसिद्ध आहे.आणि आज आपल्या भारतीय समाजव्यवस्थेकडे बारकाईने आणि उघडपणे पाहिले तर याची पदोपदी प्रचिती येते.

आपल्या भारतीय संस्कृतीत (?) वर्णव्यवस्था आणि विषमतावादी जातीव्यवस्थेतील गुरु-शिष्य म्हणजे शिक्षक-विद्यार्थी ही परंपरा पाहिली तर कालपर्यंत शिक्षण देणे हे आणि शिक्षण ग्रहण करण्याचा हक्क केवळ एका विशिष्ट वर्गासाठी म्हणजेच केवळ 'ब्राह्मण' समाजासाठी मर्यादित होता.म्हणजेच बहुजन आणि इतर वंचित घटकांना शिक्षण/ विद्या ग्रहण करण्याची तर दूरच अगदी दुरुन ऐकण्यावर देखील बंदी होती.इतिहासात डोकावल्यावर एक आश्चर्य आणि संतापजनक प्रसंग दिसून येतो, तो म्हणजे केवळ आदर भावना मनी बाळगून प्रतिमा समोर ठेवून सराव करुन धनुर्विद्येत पारंगत झालेल्या भोळ्या भाबड्या 'एकलव्या' चा केवळ तो जातीने शूद्र श्रेणीतला असल्याने त्याला शिक्षण घेण्याची बंदी असूनही त्याने स्वयं साधना करून धनुर्विद्या शिकली म्हणून भविष्यात कधीही त्याचा धनुर्धारी म्हणून गौरव होऊ नये यासाठी धनुष्य चालविण्यासाठी महत्वाचा असणारा अवयव म्हणजेच श्रेष्ठ धनुर्धारी एकलव्याच्या डाव्या हाताचा अंगठाच गुरू दक्षिणा च्या गोंडस नावाखाली

कापून घेण्याचा दुष्टपणा द्रोणाचार्यांनी केल्याचा इतिहास याच महान परंपरेतील (?) आहे. तरीदेखील गुरूंचा सन्मान, गुरू प्रती आदर व्यक्त करण्यासाठी आपण नेहमीच दक्ष असतो.आणि याच कल्पनेतून कदाचित एखादा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून पाळला जात असावा आणि प्रथा म्हणून आपल्या देशात दरवर्षी दि.पाच सप्टेबर हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जात असावा असे वाटायचे.परंतु पाच सप्टेंबर हाच दिवस का ? याचा शोध घेतला असता तो दिवस डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म दिवस असल्याने आणि त्यांनी स्वतःहून हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा व्हावा अशी इच्छा व्यक्त केली होती म्हणून साजरा करण्यात येतो असे सांगितले जाते. परंतु राहून राहून एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, त्यांच्या इच्छे व्यतिरिक्त राधाकृष्णन यांची आणखी कोणती योग्यता पाहून तत्कालीन सरकारने त्यांची शिक्षक म्हणून प्रतिमा उभी करून त्यांचा जन्म दिवस म्हणजे दि.पाच सप्टेंबर हा दिवस तमाम भारतीयांवर 'शिक्षक दिन' म्हणून लादलेला आहे याचे तर्कसंगत उत्तर आढळून येत नाही. असो !

'शिक्षक दिना' मागील सत्यता जाणून घेण्याच्या कुतुहलाने अनेक संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करून शोध घेतला असता एक आणि एकच गोष्ट अनेक संदर्भातून पुढे येते. आणि तो म्हणजे राधाकृष्णन हे मनुवाद आणि वर्णव्यवस्था वर आधारित विषमतावादी वैदिक धर्म आणि संस्कृतीला प्रमाण मानणारे होते. आणि प्रचलित व्यवस्थेनुसार एवढेसे कारणच त्यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून जाहीर करण्याच्या निर्णयाला पुष्टी देणारी आहे. राधाकृष्णन यांच्या मते 'मनुस्मृति म्हणजे एक धर्मशास्त्र असून नैतिकतेची नियमावली आहे.ती वैदिक जीवन पद्धतीला मान्यता देते आणि जातीव्यवस्थेस ईश्वराचा आदेश मानते आणि एकाग्र होऊन शिक्षण ग्रहण करण्यासाठी केवळ ब्राह्मणच पात्र आहेत.अशी मनुस्मृती आणि वर्णव्यवस्थेला प्रमाण मानणारी व्यक्ती फक्त वैदीक धर्माची प्रसारक असू शकते शिक्षक नव्हे ! भले राधाकृष्णन यांनी काही काळ अध्यापनाचे काम केलेही असेल.पण त्या कालावधीत त्याबदल्यात त्यांना मोठा गलेलठ्ठ पगार मिळत होता त्यामुळे त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेली ती निव्वळ एक नोकरी होती (सेवा अथवा शिक्षण प्रसार नव्हे) ते वैदिक धर्माचे खंदे पुरस्कर्ते आणि प्रखर हिंदुत्ववादी विचारांचे असल्याने त्यांची ओळख फार तर एक प्रखर जातियवादी, जुनाट आणि अनिष्ट रूढी आणि परंपरा मानणारे, जोपासणारे हिंदू धर्म प्रचारक अशीच करता येईल.शिक्षक म्हणून नव्हे !

एकूण काय तर आपल्या देशातील शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी राधाकृष्णन यांचा काडी इतकाही संबंध नाही. एकच अपवाद म्हणजे १९४८ मध्ये त्यांची विद्यापीठ आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाच्या वतीने केलेल्या शिफारशी देखील अप्रत्यक्षपणे मनुवाद जोपासण्यासाठी पोषक अशा जुन्या अनिष्ट रूढी आणि परंपरांचा पुरस्कार करणारे आणि भारताला अधोगती कडे नेणारे असेच होते.कारण स्त्री शिक्षण आणि स्वातंत्र्याला त्या अहवालात अजिबात स्थान नव्हते. ते स्वतः स्त्री शिक्षण विरोधी होते यांनी आयुष्यभर वैदिक परंपरेचे उदात्तीकरण करणारे साहित्य लिहिले. आपले साहित्य आणि आचरणातून यांनी सतत मनुवाद जोपासला. याउलट क्रांतीसुर्य 'महात्मा ज्योतिबा फुले' यांचे केवळ साहित्यच नव्हे,तर त्यांचे संपूर्ण आयुष्यच बहुजन आणि विषमतावादी जाती व्यवस्थेत केवळ शिक्षणच नव्हे तर निसर्गदत्त मूलभूत हक्कांपासून ही वंचित ठेवले गेलेल्या माणसात स्वाभिमान जागवण्यासाठी व्यतित झाले आहे.त्यांनी आपल्या साहित्यातून एकोणीसाव्या शतकामध्ये एक क्रांतिकारक संदेश दिला तो म्हणजे,

'विद्येविना मती गेली, मती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.या महान संदेशाने खूप मोठी क्रांती झाली आणि हजारो वर्षांपासूनचा स्त्री जातीचा आक्रोश मातीत गाडायला सुरुवात झाली.

राधाकृष्णन हे मुलीचा जन्म हा सेवेसाठी असतो. स्त्री शिक्षणा आणि स्वातंत्र्याविषयी त्यांचे विचार 'स्त्री आणि पुरुष समान मानले तरी त्यांच्या कार्यक्षेत्रात अंतर असलेच पाहिजेत स्त्रियांनी 'सुमात्रा' आणि 'गृहिणी' याच मर्यादेत राहिले पाहिजे असे होते. या उलट क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले मात्र अस्पृश्य आणि 'सर्व जातीय' स्त्री शिक्षणाचे कैवारी होते. खरं तर महात्मा ज्योतिबा फुले यांची ही खरी ओळख आहे आणि ती ख-या अर्थाने अभ्यासक्रमातून बालवयापासूनच दिली गेली पाहिजे परंतु असे होत नाही. शिक्षणातून नवा माणूस घडविला जातो. या मतावर त्यांचा दृढ विश्वास होता.त्यावर जोतिबा ठाम होते.

'गर्व से कहो हम हिंदू है 'असे म्हणणा-या कुणाही हिंदू धर्माधिकारी अथवा धर्म प्रचारकाच्या मनात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याची कल्पना आली नाही.येणार तर कशी ? पशु-गवार,ढोल-नारी सब है ताडन के हारी हीच जर धर्माची शिकवण आणि नियम असेल तर राधाकृष्णन तरी यापासून दूर कसे राहू शकतात.

भारतात शिक्षण सार्वत्रिकीकरण करण्याचे सारे श्रेय खरे तर इंग्रजांना द्यावे लागेल. जर असे झाले नसते तर केशव भट सारख्या कर्मठ ब्राम्हणाने आततायीपणा करून गोविंदराव फुले यांना संपूर्ण फुले कुटुंबावर बहिष्कार करायची धमकी देऊन जोतिबाची शाळा सोडवली असताना महात्मा जोतिबा फुलेंना आपले शिक्षण पूर्ण करताच आले नसते.त्यांनी इंग्रज शासक असताना स्वतः शिक्षण घेतले आणि शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता ओळखून एक एप्रिल १८४८ रोजी सर्व धर्मीय मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

राधाकृष्णन यांचा अजून जन्मही झाला नव्हता त्या अगोदर जवळपास चाळीस वर्षे आधी मुलीसाठी पहिली शाळा काढून शैक्षणिक क्रांती करणारे जोतिबा फुले हेच खरे तर पहिले 'शिक्षक' आणि 'महात्मा' होत. शिकवायला कुणी येणार नाही हे जाणून मुलींना शिकता यावे यासाठी त्यांना शिकवता यावे म्हणून प्रथम त्यांनी सावित्रीमाईंना शिक्षीत केले. आणि त्यांच्या सहाय्याने स्त्री शिक्षणाला सुरुवात केली.आणि नंतर १८५१ ला इथल्या विषमतावादी जातीव्यवस्थेने बहिष्कृत केलेल्या बहुजन आणि वंचितांसाठी शाळा सुरू केली. हे पाहता ख-या अर्थाने 'शिक्षक दिनाचे' हकदार महामानव क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले हेच ठरतात.

शेकडो वर्षे वर्ण, वर्ग, जातिव्यवस्थेच्या बेड्यात बंदिस्त करण्यात आलेल्या शूद्रातीशूद्र समाजाला व समस्त स्त्रियांना स्वअस्तित्वाची जाणीव करून देणारा विद्रोही विचार या भूमीत प्रथम महात्मा फुले यांनी रुजवला. स्त्री शिक्षण व स्त्रीमुक्ती तत्त्वज्ञानाचे दालन ख-या अर्थाने त्यांनीच उघडून बहुजन समाजातील शिक्षणाची चळवळ यशस्वी करण्याकडे लक्ष केंद्रित केले.

महात्मा फुले यांनी सावित्रीमाईंना घेऊन भविष्याचा अचूक वेध घेऊन दूर दृष्टिकोनातून प्रस्थापित समाजव्यवस्थेने स्त्रियां अस्पृश्य आणि बहुजनांसाठी बंद असलेले शिक्षणाचे दरवाजे उघडे केले. हे आमूलाग्र परिवर्तन महात्मा फुलेंच्या चळवळीनेच शक्य झाले.

वर्ष १८८२ मध्ये हंटर कमिशनपुढे पुण्यातून एकूण आठ निवेदने सादर करण्यात आली. त्यात स्त्री शिक्षणासाठी आग्रही असलेले एकमेव निवेदन महात्मा ज्योतिबा फुले यांचे होते. त्यांनी कमिशनपुढे जो अहवाल सादर केला, त्या अहवालामध्ये प्रामुख्याने शिक्षणाचा मुद्दा त्यांनी मांडला. वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत सर्व मुलामुलींसाठी सक्तीचे व मोफत शिक्षणाची मागणी त्यांनी केली.

स्वत: महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई या दोघांनी पुढाकार घेऊन शिक्षण देण्यास सुरुवात केली नसती तर आज बहुजन समाज आणि विशेष करून सर्वधर्मीय महिलांची काय आणि कशी स्थिती राहिली असती याचा तमाम सर्वधर्मीय महिलांनी ही अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे.द्रोणाचार्य आणि राधाकृष्णन या दोघांमध्ये एक समान स्वार्थ आणि दुष्ट बुद्धी आहे आणि ती म्हणजे आपल्या क्षेत्रात आपल्याशिवाय अन्य कुणीही पारंगत असू नये.कुणाचेही नावलौकिक होता कामा नये.म्णून तर एकलव्याचा अंगठा मागणे आणि राधाकृष्णन यांची प्रबंध चोरी या दोन्ही घटना एकाच श्रेणीतील आहेत.

राधाकृष्णन यांनी आपल्या विद्यार्थ्याचा पी.एच .डी. चा प्रबंध चोरून स्व: ताच्या नावावर प्रकाशित केला होता.त्या विरुद्ध १९३० साली कलकत्ता हायकोर्टात एक खटला अत्यंत गाजला. होता अशा एक विशिष्ट कर्मठ धर्म प्रचारकाच्या नावाने 'शिक्षक दिन' साजरा करणे हा शिक्षण प्रसारासाठी संबंध आयुष्य व्यतीत करणारे क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांचा अवमान तर आहेच. शिवाय त्यांच्या तत्वज्ञानानुसार चालणा-या तमाम आदर्शवादी शिक्षकांचा ही घोर अवमान आहे. विशेष म्हणजे देशात आणि शिक्षण क्षेत्रात यामुळे चुकीचा पायंडा पडला आहे आणि पडणार आहे हे मात्र क्की!.

शिक्षकांच्या अंगी कुठल्याही एका विशिष्ट जात अथवा धर्माविषयी ममत्वाची भावना अथवा धर्मांधता न राहता अखिल मानवतेच्या विकास आणि कल्याणाची तळमळ असावी.आणि या कसोटीत क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले हे तंतोतंत बसतात म्हणून त्यांचा जन्म दिवस म्हणजेच दर वर्षी अकरा एप्रिल हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करुन त्यांचा गौरव करणे हे अधिक संयुक्तिक आणि न्यायसंगत ठरणार आहे इतकेच !

**विठ्ठलराव वठारे** अध्यक्ष
जन लेखक संघ, महाराष्ट्र.

पान १ वरुन

### एकात्मिक फलोत्पादन विकास..

व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवर्गातील शेतक-यांना आवाहन करण्यात येते की, वरील प्रमाणे घटकासाठी अधिकाधिक शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. एस. गावसाने यांनी केले आहे.

### केंद्र शासनाकडून सोलापूर..

प्रकल्प मान्यता समितीने मान्यता दिली आहे. सोलापूर - डाळिंब क्लस्टरसाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मे. बी. व्ही. जी. ग्लोबल फार्म वर्क्स लि. सोलापूर या संस्थेस मान्यता दिली. सदर प्रकल्पासाठीचे मे. बी. व्ही. जी. ग्लोबल फार्म वर्क्स लि. सोलापूर यांना अंमलबजाणी यंत्रणा म्हणून स्वीकृती पत्र ०९ ऑगस्ट २०२३ रोजी प्राप्त झाले व सुनील चव्हाण (आयुक्त कृषी) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्याप्रसंगी डॉ. के. पी. मोते, संचालक फलोत्पादन, श्री. उदय देशमुख (प्रकल्प व्यवस्थापक), श्री. विजयकुमार चोले (मे.बी. व्ही. जी. ग्लोबल फार्म वर्क्स) हे उपस्थित होते.

या प्रकल्पामुळे २० हजार हेक्टर डाळिंब क्षेत्र व ३० हजार शेतक-यांना फायदा होईल. या प्रकल्पाची किंमत रक्कम रू. २४७.६७ कोटी असून त्यापैकी रक्कम रू. ९८.९२ कोटी केंद्रीय कृषि मंत्रालय

टिशू कल्चर प्रयोग शाळा- २, १२ हजार ९०० हे. क्षेत्रावरील जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन, २० हजार हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन- २० हजार हे. क्षेत्रावर एकात्मिक किड व्यवस्थापन, १२ हजार ९०० हे. क्षेत्रावर प्लास्टिक अच्छादन, २० हजार हे. क्षेत्रावरील फळपिकाचे ग्लोबल गॅप सर्टिफिकेशन, शीतगृह (५००० चढ) - २, पूर्व शीतकरण गृह/फिरते पूर्व शीतकरण गृह-२८, एकात्मिक प्रक्रिया आणि मूल्यवर्धन केंद्र- २, टर्मिनल मार्केट/होलसेल मार्केट- १ हे घटक राबणीण्यात येणार आहेत. हा प्रकल्प ४ वर्षात कार्यान्वित होणे अपेक्षित असून यामुळे सोलापूर डाळिंब क्लस्टर फलोत्पादन परिसंस्थेचा कायापालट होण्यास मदत होईल.

### मराठा समाजावर हल्ला प्रकरणी

**वैभव मोरे, अतिश पवार, योगेश पवार, बालाजी पाटील, मारुतीराव बावडे, मनोज इंगुले, निखिल पाटील, देवानंद काजळे, ज्ञानेश्वर भोसले, काशिनाथ कदम, आकाश शिंदे, गणेश पाटील, महेश दणके, गोविंदराव शिंदे, प्रथमेश पवार, मनोज गंगणे, मंगेश फुटाणे, सुरेश कदम, स्वामीराव मोरे, प्रशांत भगरे, स्वामिनाथ बाबर, नागराज पाटील, आकाश सुर्यवंशी, रवी पोळ, विनायक भोसले, ओंकार देशमुख, शरद भोसले, लक्ष्मण शिंदे, राजाराम पवार, अमर शिंदे, प्रसाद मोरे, अजय शिंदे, रावसाहेब मोरे, सिद्धाराम माळी, फहीम पिरजादे, अभिषेक चव्हाण, दत्ता मोरे, दत्ता माने, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, शुभम कामनुरकर, शुभम सावंत, शुभम चव्हाण, विकी गडदे, ओंकार दुरुगकर, विशाल कलबुर्गी, राज जोजन, अक्षय पवार, राहूल शिंदे, निखिल शिंदे, श्रीशैल कुंभार, महेश निंबोळे, शरद पवार, अमित कोळी, अंकुश मोरे, गीत पवार, अनंत पवार, अंबादास शिंदे, सुमित कल्याणी, विष्णू गुमटे यांच्या सह शेकडो च्या संख्येने मराठा समाजातील युवक उपस्थित होते.**

### मुंबईच्या आदेशाने आंदोलकांवर ..

पोलिसांना मी दोष देणार नाही. त्यांना ज्यांनी आदेश दिला? याची उच्चस्तरीय नाही तर यासाठी न्यायालयीन चौकशीची गरज आहे.आंदोलकाना शांतता प्रस्थपित करण्याचे मी आवाहन केले, जाळपोळ करू नये असेही शरद पवार म्हणाले.

शरद पवार मुख्यंमत्री असतांना गोवारीमध्ये झालेल्या आंदोलनात अनेकांचे जीव गेले होते. पण त्यावेळी शरद पवारांनी तिथे भेट दिली नाही आणि राजीनामा सुद्धा दिला नसल्याचा आरोप फडणवीस यांनी केला होता. त्यांच्या आरोपाला उत्तर देतांना आज शरद पवार म्हणाले की, गोवारीमध्ये आंदोलनात चेंगराचेंगरी झाली होती. त्यावेळी मी नागपुरात नव्हतो, मुंबईत होतो. या घटनेनंतर माझ्या सरकारमधील आदिवासी कल्याण मंत्र्यांनी राजीनामा दिला होता. ज्यांनी मला प्रश्न विचारला त्यांची जबाबदारी काय? असे म्हणत पवारांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता टीका केली आहे.

### शाब्बास..! आदित्य एल१

दिशेने प्रवास सुरु होईल.

चौथ्या टप्प्यात हे यान लॅग्रेंज बिंदूच्या कक्षेत प्रस्थापित करण्यात येईल. पाचव्या टप्प्यात हे यान सूर्याचा अभ्यास करण्यास सुरुवात करेल. हा संपूर्ण प्रक्रियेस जवळपास चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. पण पुढील पाच वर्षांसाठी हे यान सूर्याचा अभ्यास करण्यासाठी इस्रोला मदत करणार आहे.

आदित्य एल१ मध्ये सात पेलोड्स बसवण्यात आले आहेत. यामधील चार पेलोड्स हे थेट सूर्याचा अभ्यास करणार आहेत. तर उर्वरित तीन हे वातावरणाचा अभ्यास करतील. विशेष म्हणजे ग्रहणकाळात देखील सूर्याचा अभ्यास करण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नसल्याचं इस्रोच्या शास्त्रज्ञांकडून सांगण्यात येत आहे. सूर्य हा एक तारा आहे. त्यामुळे सूर्यावर सतत काही ना काही स्फोट होत असतात. पण या कोणत्याही स्फोटांचा परिणाम या यानावर होणार नाही. सूर्यामधील अनेक रहस्यांचा उलगडा करण्यास हे यान इस्रोला मदत करेल. दहा दिवसांपूर्वीच भारताने चंद्रावर इतिहास रचला होता. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. चंद्राच्या यशस्वी मोहीमेनंतर आता इस्रो सूर्याचा अभ्यास करणार आहे.

इस्रोची ही पहिलीच सूर्य मोहीम असून या मोहीमेकडे जगाचं लक्ष लागून राहिलं होतं. पण आता या मोहिमेचं देखील यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं आहे. तसेच या यानाचा पुढचा प्रवास देखील सुलभ होण्यासाठी सध्या भारतीय प्रार्थना करत आहेत. तसेच हा प्रवास लवकरच यशस्वीरित्या पूर्ण होणार असल्याचा विश्वास देखील इस्रोच्या शास्त्रज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध : आ.जयंत आसगावकर

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्रासह सीमावर्ती भागातील अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांचे अनेक प्रश्न मागील कित्येक वर्षांपासून प्रलंबित असून पुणे विभागाचा शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणुन हे सर्व प्रश्न येणाऱ्या वर्षभरात सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे मत पुणे विभाग शिक्षक मतदारसंघांचे आ. जयंत आसगावकर यांनी व्यक्त केले. अक्कलकोट येथील फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शिक्षक संवाद मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी फत्तेसिंह चे अध्यक्ष राजीव माने हे होते. यावेळी मंचावर उपाध्यक्ष प्रल्हाद जाधव, विश्वस्त बाळासाहेब मोरे, संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जाधव-फुटाणे, विश्वस्त सुधाकर गोंडाळ उपस्थित होते.

प्रारंभी उपाध्यक्ष प्रल्हाद जाधव यांनी प्रास्तविकातुन मेळाव्याचा हेतू स्पष्ट केला. यावेळी पुढे बोलताना आ. आसगावकर म्हणाले, मी निस्सीम स्वामीभक्त असून १९९० पासून स्वामींच्या दर्शनाला येत असतो. स्वामींच्या आशिर्वादामुळे आमदार झालो. या तालुक्यातील शिक्षकांनी मला भरभरून प्रेम दिले. त्यातून उतराई होणे अशक्य असले तरी प्रत्येक शिक्षक सुखाने आणि आनंदाने जीवन जगला पाहिजे यासाठी माझ्या आमदारकीचा पुरेपूर वापर करेन. सर्व शिक्षकांनी आपले प्रश्न थेट माझ्याशी संपर्क करून मांडावेत. आपल्या सेवेसाठी मी तत्पर आहे. यावेळी बोलताना अध्यक्ष राजीव माने म्हणाले, तालुक्यातील सर्वात जुनी शिक्षण संस्था असलेल्या फत्तेसिंह संस्थेच्या विकासासाठी आ. आसगावकर यांचे नेहमीच योगदान असते. यापुढेही त्यांचे सहकार्य मिळत राहील.




**या कार्यक्रमात बोलताना आ. आसगावकर यांनी फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या विस्तार व वाटचालीबद्दल समाधान व्यक्त करत संस्थाध्यक्ष राजीव माने आणि विश्वस्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जाधव फुटाणे यांच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

यावेळी पुणे विभाग मुख्याध्यापक संघांचे सचिव श्रवण बिराजदार, शहाजी ठोंबरे, अभिजित पाटील, लक्ष्मण चलगेरी, अण्णासाहेब गायकवाड, कृष्णदेव बेहरे, रामचंद्र जानकर, वैभव पाटील, प्रा. मनोज जगताप, तालुक्यातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले. आभार संतोष जाधव यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# हंजगी आश्रम शाळेत झाडांना राखी बांधून झाडांच्या रक्षणाची भावांनी घेतले जबाबदारी

## रक्षाबंधनाच्या दिवशी वृक्षबंधनाच्या माध्यमातून केली पर्यावरणाविषयी जागृती



अक्कलकोट/प्रतिनिधी : संपूर्ण देशभरात उत्साहापूर्वक वातावरणात रक्षाबंधनाचा सण साजरा होत असताना अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रम शाळेतील विद्यार्थी मात्र पर्यावरणाच्या रक्षणासाठी झाडाला राखी बांधून व झाडांना भाऊ मानून घेतली झाडांच्या रक्षणाची जबाबदारी.या वृक्षबंधनाच्या माध्यमातून लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती करण्याचे काम आश्रम शाळेतील विद्यार्थ्याकडून होत असल्याने या अनोख्या रक्षाबंधना चे सर्वत्र कौतुक होत आहे.निसर्गाचे रक्षण करण्याची गरज ओळखून आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून आपली भावना व्यक्त केली आहे. शिक्षकांच्या पर्यावरण पूरक व नाविन्यपूर्ण संकल्पनेला मुहूर्तरूप देत विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारातील झाडांना उत्साहापूर्वक वातावरणात राखी बांधत पर्यावरणाप्रति जागरूकता आणि निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करताना दिसून आले.या झाडांमुळेच शाळेच्या सौंदर्यात भर पडून हरित शाळा म्हणून उदयास येण्यास मदत होणार आहे.वृक्षारोपण करणे हा उद्देश नसून लावलेले वृक्ष टिकवणे हा एकमेव प्रामाणिक प्रयत्न असल्याचे यावेळी बोलताना विद्यार्थ्यांनी सागितले. झाडे माणसाला जगण्यासाठी मदत करतात, त्यामुळे त्यांना जगवण्यासाठी माणसानेही जागरुकता दाखवली पाहिजे या भावनेने झाडांना राख्या बांधण्यात येत असल्याचे शाळा व्यवस्थापकाच्या वतीने सांगण्यात आले.या शाळेतील विद्यार्थी एवढेवरच न थांबता गावातील प्रत्येक ग्रामस्थांना आणि पालकांना झाडांना आणि अगदी आपल्या घरासमोरील रोपट्यांना राखी बांधण्याचे आवाहन करताना दिसून आले.या राख्या बांधताना आम्ही ही तुमचे रक्षण करू, असे आश्वासन या विद्यार्थ्यांनी झाडांना दिले.झाडांना राख्या बांधताना झाडांना त्रास होऊ नये म्हणून राख्यांना अत्यंत नाजूक दोरे वापरण्यात आले आहे.या वृक्षबंधनाच्या माध्यमातून लोकांमध्ये जागरुकता वाढवण्याचे काम आश्रम शाळेतील विद्यार्थ्याकडून होत असल्याने या विद्यार्थ्यांचे समाजमाध्यमातून सर्वत्र कौतुक होत आहे.भारतातील प्रत्येक सण हे निसर्गावर आधारित आहेत. याच सणांच्या माध्यमातून जर का सकारात्मक पद्धतीने निसर्ग रक्षणाचा विचार आणि गरज समाजापर्यंत पोहोचवली तर नक्कीच निसर्गाचे रक्षण होण्यास मदत होणार आहे.

> आज तालुक्यात दररोज बहुसंख्य झाडे कापली जातात अनेक झाडांचे निर्दयपणे कत्तल होताना पहायला मिळत आहे.आपल्याला झाडांपासून ऑक्सिजन मिळतो.या झाडांच्या आधारे आपण जगतो, हेच आपण विसरत आहोत.म्हणून माझ्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी आता या झाडांना वाचवण्याचा निश्चय केला आहे. त्यांनी झाडांना भाऊ मानून त्यांच्या रक्षणाची जबाबदारी घेतली आहे.
> **– यशवंत पाटील, मुख्याध्यापक प्राथमिक आश्रम शाळा हंजगी.**

### प्रलंबित प्रश्न वेळेवर मार्गी लागत असल्याने कर्मचाऱ्यात उत्साह.

# जुलै-ऑगष्ट महिन्याचा लागोपाठ पगार झाल्याने जिल्ह्यातील आश्रम शाळा कर्मचाऱ्यात समाधान



अक्कलकोट/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील खासगी अनुदानित आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांना नियमित पगार व प्रलंबित प्रश्नासाठी नेहमीच प्रशासनाशी संघर्ष करावा लागत होता.परंतू जेव्हा सोलापूर जिल्हा समाजकल्याण सहाय्यक आयुक्त म्हणून नागेश चौगुले यांची वर्णी लागताच जिल्ह्यातील खासगी अनुदानित आश्रम शाळा कर्मचाऱ्यांचे पगार आणि रखडलेली प्रलंबित प्रश्न मार्गी लागत असल्याचे जिल्ह्यातील आश्रम शाळा कर्मचाऱ्यातून बोलले जात आहे.

सध्या आश्रम शाळा कर्मचाऱ्यांचे जुलै आणि ऑगष्ट या दोन महिन्याचे पगार लागोपाठ झाल्याने कर्मचाऱ्यात उत्साह संचारला आहे.कारण आज पर्यंत आश्रम शाळा कर्मचाऱ्यांना पगार आणि प्रलंबित प्रश्नासाठी नेहमीच प्रशासनाशी झगडावे लागत होते.अन्य विभागा प्रमाणे आश्रम शाळा कर्मचाऱ्यांचा ही पगार दर महिन्याच्या एक तारखेला व्हावा म्हणून आश्रम शाळा कर्मचारी प्रशासनाकडे नेहमीच दाद मागत होते.आता कोठेतरी या कर्मचाऱ्यांच्या मागणीला न्याय मिळताना दिसून येत आहे.

आश्रम शाळा कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याने त्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

वेळेवर पगार होत नसल्याने कर्मचाऱ्यांचे बॅकचे हप्ते,घरभाडे,दवाखाना ,मुलांचे शिक्षण,किराणा आदी आर्थिक अडचणींना कर्मचाऱ्यांना तोंड द्यावे लागत होते.समाजकल्याण सहाय्यक आयुक्त म्हणून नागेश चौगुले यांनी पदभार घेताच जिल्ह्यातील आश्रम शाळा कर्मचाऱ्यांचे पगार आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लागत असल्याने आश्रम शाळा कर्मचाऱ्यातून समाधान व्यक्त होत आहे.

आज जिल्ह्यातील आश्रम शाळेतील शिपाई पासून ते प्राचार्य पदापर्यंत सर्वच कर्मचार्यांच्या प्रलंबित कामांना न्याय मिळताना दिसून येत आहे.महिना संपताच कर्मचाऱ्यांच्या हातात पगार आणि कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागत असल्याने आश्रम शाळेवर काम करण्यास उत्साह येत असल्याचे कर्मचाऱ्यातून बोलले जात आहे.यापूर्वी समाजकल्याण विभागाच्या खासगी अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना चार- चार महिने वेतना पासून वंचित रहावे लागत होते.

यामुळे कर्मचाऱ्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत होते.आता आश्रमशाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार 'समाजसेवार्थ' संगणकीय प्रणालीद्वारे थेट कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने कर्मचाऱ्यांचे नियमित पगाराचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली आहे.

# मराठा आरक्षण आंदोलकांच्यावर लाठीहल्ला सैनिक टाकळीमध्ये जाहीर निषेध



टाकळी/ प्रतिनिधी : जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी या गावांमध्ये मराठा आरक्षणाची मागणी घेऊन आंदोलकांच्याकडून २९ ऑगस्ट पासून अत्यंत शांततामय मार्गाने आमरण उपोषणाच आंदोलन चालू होतं. आज सायंकाळी चर्चा करण्यासाठी म्हणून आलेल्या पोलिसांच्या कडून अचानक आंदोलकांच्यावर सरकारने त्या ठिकाणी बळाचा वापर करून लाठी हल्ला करून हवेत गोळीबार, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. आणि आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामध्ये अनेक आंदोलक बायका मुलासह जबर जखमी झाले.महाराष्ट्र सरकारच्या या दडपशाहीचा निषेध करण्यात आला ३ सप्टेंबर रोजी सैनिक टाकळी संपूर्ण कामकाज बंद ठेवून या घटनेचा निषेध करणार सकल मराठा फाउंडेशन प्रणिता भारतीय मराठा संघ व आंदोलन अंकुश संघटना यांनी केले आहे

# परीक्षार्थींना छळणाऱ्या टीसीएस कंपनीचे परीक्षा सेंटरची मान्यता रद्द करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करा : मनीष नरवडे

नागपूर : १७ ऑगस्ट पासून महाराष्ट्र राज्यामध्ये तलाठी भरती परिक्षा सुरु झाली. त्या दिवसापासून परिक्षामध्ये रोज नवीन घोटाळे समोर येत आहे. पेपर फुटणे, ऐनवेळी परिक्षा केंद्राची अदलाबदल होणे, कुठे सॉप्टवेअर हँग होणे असे एक ना अनेक प्रकार घडत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होत आहे. तपासणीच्या नावाखाली वेगवेगळ्या प्रकारचे छळ होत असल्याचा आरोप मनीष नरवडे यांनी केला आहे, परिक्षा केंद्रावर महिलांचा अपमान होत आहे.

परिक्षा केंद्रावर एक ना एक वस्तु जमा करुन घेतली जात आहे, त्यात महिलांचे सौभाग्यचे लेणं असलेले मंगळसुत्र, दागदागिने सुध्दा काढून ठेवण्यास सांगत आहे. म्हणजे महिलेला परिक्षा केंद्रावर एक प्रकारे विधवा




केल्यासारखीच वागणूक दिल्या जात असल्याने महिलांना मानसिक मनस्थाप सहन करावा लागत आहे,

त्याचप्रमाणे बॅग, मोबाईल, अंगातील बनियन, बेल्ट, इत्यादी बाजूला काढायला लावून ते ठेवण्यासाठी अव्वाच्या सव्वा रक्कम आकारुन बेरोजगार तरुणांची लूट केली जात आहे. परिक्षा केंद्रावर साहित्य, वस्तू ठेवण्यासाठी जागा नसेल किंवा पार्किंगची व्यवस्था नसेल अशा परिक्षा केंद्रावर कुठलीच परिक्षा घेण्याचे अधिकार देण्यात येवू नये. तसेच अशा परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करावी. यापुढे ज्या सेंटरवर परीक्षा घेतली जाते, तेथे वाहनतळ मोफत उपलब्ध करुन द्यावे, तलाठी पदाच्या परीक्षा सुरु झाल्यापासून वारंवार गोंधळ निर्माण करुन बेरोजगार तरुण-तरुणींना छळणाऱ्या टीसीएस कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात यावा व परिक्षेचे योग्य ते नियोजन करुन परिक्षा नव्याने व पारदर्शक पध्दतीने घेण्यात यावी, अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात)पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत विभागीय आयुक्त सचिवालय कक्ष यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी योगेश उबाळे आकाश साबळे उपस्थित होते.

# भैरवनाथ कानडे यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य शिक्षक पुरस्कार जाहीर

वागदरी/प्रतिनिधी: महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च असा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२२ २३ श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालय चिकुंद्रा सहशिक्षक / निवेदक भैरवनाथ कानडे यांना जाहीर झाला



असून सदर पुरस्कार ५ सप्टें रोजी शिक्षकदिनी मुंबई येथे होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभात राज्याचे मुख्यमंत्री मा . ना .एकनाथजी शिंदे , उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस ना . अजित पवार शालेय शिक्षण मंत्री दीपकजी केसरकर व मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे . याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

# एन.सी.सी ऑफिसर उदय पाटील सर यांना रोटरी क्लब यांच्यामार्फत नेशन बिल्डर पुरस्कार प्राप्त

सैनिक टाकळी/ संजय चव्हाण: कोल्हापूर येथील श्री.छ. शिवाजी हायस्कूल, सैनिक टाकळी या शाळेचे एन.सी.सी.ऑफीसर उदय पाटील सर यांना रोटरी क्लब ऑफ कुरुंदवाड यांचे मार्फत नेशन बिल्डर पुरस्कार मिळाले बद्दल हार्दिक हार्दिक अभिनंदन. खरोखरच नयन पाटील सर या पुरस्कारासाठी पात्र आहात.



सैनिक टाकळी या गावासाठी NCC च्या माध्यमातून भरपूर सैनिक घडविण्याचे काम सरांनी केले आहे. टाकळीतील सैनिकांना जो मान सन्मान गावामध्ये मिळत आहे त्यामध्ये नयन सरांचा शंभर टक्के वाटा आहे. खरोखरच योग्य व्यक्तीला पुरस्कार मिळाला आहे त्यामुळे नयन पाटील सरांचे सर्वत्र कौतुक होत आहे.रोटरी क्लब ऑफ कुरुंदवाड यांचे मार्फत नेशन बिल्डर पुरस्कार मिळाले बद्दल हार्दिक हार्दिक अभिनंदन. खरोखरच नयन पाटील सर या पुरस्कारासाठी पात्र आहात. सैनिक टाकळी या गावासाठी छउउ च्या माध्यमातून भरपूर सैनिक घडविण्याचे काम सरांनी केले आहे. टाकळीतील सैनिकांना जो मान सन्मान गावामध्ये मिळत आहे त्यामध्ये नयन सरांचा शंभर टक्के वाटा आहे. खरोखरच योग्य व्यक्तीला पुरस्कार मिळाला आहे त्यामुळे नयन पाटील सरांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# निफाड येथे मुस्लिम बांधवांनी केले वरुणराजा साठी नमाजपठण

निफाड/शहर प्रतिनिधी: पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून निफाड येथिल मुस्लिम बांधवांनच्या वतीने जामा मस्जिद ट्रस्ट आणि शेख फरीद बाबा पिर कब्रस्थान कमिटीने येथिल इदगाह मध्ये पाऊस पडण्याकरिता विशेष नमाज पठण करून दुवा करण्यात आली.

सध्या शेतातील उभी पिके करपून चालले असून जनावरे व माणसांच्या पिण्याच्या पाण्याची भीषण संकट येऊ पाहत आहे. शेतमजुरांच्या हाताला काम मिळेना असे झाले आहे.पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या उद्भवत असुन बळीराजा आभाळाकडे टक लावून वरून राजाची वाट पाहत आहे. दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा निवारण व्हावं व पाऊस वेळेवर पडावा म्हणून निफाड येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत नमाज पठण केले आहे यांप्रसंगी.. मौलाना नफीस अहमद . शकील पठाण.जावेद शेख.दिलवर तांबोळी.आयुब पठाण. पप्पू शेख. हाजी फकीर भाई.

पप्पू पठाण.इमाम भाई कुरेशी. इरफान सय्यद. आसिफ पठाण. आरिफ मणियार. आरिफ अन्सारी. वसीम शेख. अमजद शेख .बिरु मनियार. तौसिफ पटेल. तन्वीर राजे. असफ पठाण. तौसिफ शेख. मुज्जु मुलानी. सरोवर मुलानी. अस्लम शेख .इम्तियाज शेख.सर्व मुस्लीम बांधव उपस्थित होते

# आनंद बुध्द विहार तुळजापूर येथे श्रावण पौर्णिमा खीरदान व अंधश्रध्दा निर्मूलनाच्या संकल्पा सह उत्साहात साजरी

नंदगाव/अजिंक्य मस्के: तुळजापूर तालुक्यातील आनंद बुध्द विहार हडको येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने श्रावण पौर्णिमा हर्ष उल्हासात साजरी करण्यात आली. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, तुळजापूर या समाज विज्ञान संस्थेचे उप संचालक आयु. डॉ. रमेश जारे सर व परिवाराच्या वतीने सर्वांना मंगल कामना सह खीरदान करण्यात आले. वंदनेसाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील डॉ. गजानन हिवाळे सर व त्यांचा परिवार तसेच शीलवान गुणवान विद्यार्थी व कर्मचारी, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आयु. उळेकर सर, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा तालुका शहर शाखेचे पदाधिकारी, तुळजापूर शहर व तालुक्यातील उपासक उपासीका, बालक बालिका व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विहारात नियमित येणारी मुले हर्ष चौधरी, आकाश कदम, यश बनसोडे, संभव पगारे, आर्या पांडागळे, इत्यादींनी अंगुली मालाची जातक कथा सांगून श्रावण पौर्णिमेचे महत्त्व सांगितले. आयु. उळेकर सर यांनी समाजातून अंधश्रध्दा हद्दपार करण्यासाठी बौद्ध धम्म आणि भारतीय संविधान हे पुढच्या पिढीत रुजने अत्यावश्यक आहे असे सांगितले. अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने व जारे सरांच्या वतीने यावेळी प्रबोधनपर पुस्तके व मासिक अंक विहारात भेट देण्यात आले. आयु. रमेश जारे सर यांनी मनोगत व्यक्त करताना उत्तम समाज निर्मिती साठी प्रत्येकाला धम्माचे अंग असणे अत्यंत आवश्यक आहे असे सांगितले. आपण ज्या पण नोकरी व्यवसायामध्ये असलो तरी आपण धम्माचे आचरण केलेच पाहिजे. पुढची पिढी ही मोठ्यांचे अनुकरण करूनच शिकत असते म्हणून मोठ्यांनी धम्म समजून घ्यावा व आचरणात आणावा असे आवर्जून सांगितले. उदाहरणार्थ १९५६ साली बाबासाहेबांनी धम्म दिला पण ६७ वर्षात आजपर्यंत फक्त एकच अंत्यविधी (आपसींगा येथे वसंत सोनवणे यांच्या परिवारात) बौद्ध संस्कार पद्धतीने पहिला. हे आचरण अनुसरण वाढल पाहिजे व सर्वांनी धाडसाने आत्मविश्वासाने धम्माचे आचरण केलेच पाहिजे ही कळकळीची विनंती केली.



आयु. सुमित्रा ताई माने यांनी श्रावण पौर्णिमेनिमित्त सर्वांच्या प्रती मंगल कामना व्यक्त केल्या.

टाटा इन्स्टिट्यूट चे श्रद्धावान विद्यार्थी आयु. अन्वय जांभूळकर व अतुल साहेबराव येरेकर यांनी विहारात होणाऱ्या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला व कार्यकर्त्यांचे कौतुक केले. आयु. दत्ता माने यांनी आपण सर्व बाबासाहेबांचे अनुयायी आहोत. मी प्रथमतः भारतीय आहे अन शेवटीही भारतीयच..! त्यामुळे सर्वांनी सर्वांशी मैत्रिभावनेने राहणे ही काळाची गरज आहे आणि धम्म आचरण सोबत इतर समजाप्रती मैत्रीभाव असणे सुद्धा खूप गरजेचे आहे हे समजावून सांगितले. तुळजापूर तालुक्यातील बाबासाहेबांचा सहवास लाभलेले दिवंगत वसंतआप्पा केशव सोनवणे, येडशी येथील बौद्ध उपासक प्रवीण निकाळजे व तुळजापूर येथील दिवंगत पूजा कदम यांच्यासह जे उपासक कालकथित झालेले आहेत त्या सर्वांना २ मिनिट स्तब्ध उभे राहून आदरांजली वाहण्यात आली. आयु. शकुंतलाताई जारे, त्यांची सुविद्य कन्या श्र्वेताताई व परिवाराच्या वतीने उपस्थित सर्वांना स्वादिष्ट व पोष्टिक अशी खीर दान करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा उस्मानाबाद चे सरचिटणीस आयु. सुकेशन ढेपे यांनी तर आभारप्रदर्शन पर्यटन प्रमुख विश्वास भाऊ पांडागळे यांनी केले.

# अवैध वाहतूक करणाऱ्या जीप व रिक्षामुळे अक्कलकोट बसस्थानक समोर वाहतूक कोंडी



अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोट बस स्थानका समोर अवैध वाहतूक करणाऱ्या जीप व रिक्षामुळे दिवसभरात वारंवार वाहतूक कोंडी होत असतानाही पोलीसांची जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरीकातून संताप व्यक्त किला जात आहे. फळविक्रेते गॅरेजवाले वेल्डींगवाल्यानी अक्कलकोट बस स्थानकास फळ विक्रेते गॅरेज वाले वेल्डिंग वाल्यांच्या अतिक्रमणाने चोहोबाजूने व्यापल्या मुळे स्थानकातून बस बाहेर निघता निघत नाही, त्यात बसस्थानका समोरील बाजूस व आतील बाजूस अवैध वाहतूक करणारे जिप रिक्षावाले बिंधास वावरतात प्रवांशी भरत असतात मनमानेल तिकडे आपले वाहन लाऊन अवैध प्रवासी वाहतूक करीत असतात या मुळे बस स्थानकातून बस बाहेर काढताना चालक व वाहकांना नाकी नऊ येत असते समोर लावलेली वाहन काढण्यास सांगीतले असता बसच्या बाहक चालकांना आरवाच्य भाषेत शिवी गाळ करणे मारा मारी करणे आदी प्रकार घडत असते या अवैध वाहतूक करणारे जीप रिक्षा मुळे बस स्थानका समोर दिवस भरात अनेक वेळा वाहतूक कोंडी होत असते. या ठीकाणी एक ही वाहतूक पोलीस नसतो. बस स्थानकात महीन्यातून किमान दोन तीन वेळा प्रवाशाचे पाकिट मारला जातो मणी मंगळसूत्र सोने चैन चोरी होत असते. तिथे पोलीस बंदोबस्त असणे अपेक्षीत असताना उत्तर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यां कडुन पोलीस बंदोबस्त ठेवला जात नसल्याने नागरीकातून ओरड होत आहे,वारंवार होत असलेल्या वाहतूक कोंडी बाबत परिसरातील नागरीक वारंवार तोंडी तक्रार करून पोलीस दखल घेत नसल्याने तक्रार तरी कोणाकडे करावे असे संताप नागरिकांतून व्यक्त केला जात आहे.

# पुणे जिल्ह्यातील धरणातून उजनीत पाणी सोडा, पिकांची तहान भागवा; आमदार शहाजीबापूंची मागणी

सांगोला/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांची आणि पिकांची तहान भागवण्यासाठी पुणे जिल्ह्यातील धरणातून उजनी धरणात पाणी सोडण्याची मागणी सांगोला तालुक्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी केली आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यात भीषण पाणी टंचाईचे चटके बसू लागलेत. शेतकऱ्यांची खरीपाची पिकं वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळं शहाजीबापू पाटील यांनी पाणी सोडण्याची मागणी केली आहे.

नीरा उजवा कालव्यातून पाणी पाळी देण्याच्या मागणीसाठी पंढरपूर येथील तहसील कार्यालयासमोर सांगोला आणि पंढरपूरच्या शेतकऱ्यांनी बेमुदत आंदोलन सुरु केले होते. या आंदोलनात आमदार शहाजीबापू पाटील हेदेखील सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करुन नीरा उजवा कालव्याला पूर्ण क्षमतेने पाणी पाळी सोडण्याची मागणी केली होती. त्यानंतर उपोषण थांबवण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात सध्या बिकट परिस्थिती आहे. पाऊस न झाल्यानं उजनी धरणात पाणी साठू शकले नाही. गेल्यावेळी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आमदार बबनदादा शिंदे यांनी शेतीसाठी कालव्यातून एक आणि पिण्यासाठी नदीत पाणी सोडण्याची मागणी केली होती. मात्र, सोलापूरचे आमदार विजय देशमुख यांनी पिण्याचा कोटा राखीव ठेऊन पाणी सोडण्याबाबत भूमिका घेतली होती. उजनी धरणातून सोलापूर जिल्ह्यातील पिकांना जीवदान देण्यासाठी एक पाण्याची पाळी आणि सोलापूरसह पंढरपूर, सांगोला आणि इतर नगरपालिकांना पिण्याच्या पाण्यासाठी उजनीतून पाणी द्यायचे झाल्यास यासाठी १४ टीएमसी पाण्याची गरज आहे. सध्या उजनी धरणातून एवढे पाणी सोडणे शक्य नसल्याने पुणे जिल्ह्यातील पाच धरणातून प्रत्येकी दोन टीएमसी आणि उजनीतून चार टीएमसी पाणी दिल्यास पिकांची आणि माणसांची तहान भागू शकेल असे शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

पाणी प्रश्नाबाबत कालवा सल्लागार समितीची २ सप्टेंबर रोजी बैठक होणार आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातील धरणातून उजनीत पाणी सोडण्याची मागणी करणार असल्याचे आमदार शहाजीबापू यांनी सांगितले. सध्या महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळी स्थिती आहे. येत्या १५ दिवसात पाऊस न झाल्यास दुष्काळ जाहीर करण्याबाबत आम्ही शासनाकडे मागणी करणार असल्याची माहिती शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे. दरम्यान, उजनी धरणाच्या वरील बाजूस पुणे जिल्ह्यात मुळा मुठा, उपखोऱ्यातील खडकवासला, टेमघर, पानशेत, मुळशी, पवना ही धरणे आहेत. तर घोड उपखोरऱ्यात पिंपळगाव जोगे, माणिकडोह, वडज, डिंभे, चीलेवाडी आणि घोड ही धरणे तर भीमा उपखोऱ्यातील कलमोडी, वडिवले, चासकमान , आंध्रा आणि भामा आसखेड अशी लहान मोठे १८ धरणे आहेत. ही धरणे भरल्याशिवाय हे पाणी उजनी धरणात येत नाही. दुर्दैवाने ज्यावेळी पूरस्थिती असते तेव्हा मात्र पुणे जिल्ह्यातील धरणातून पुराचे पाणी उजनीत सोडून दिले जाते. यामुळं सोलापूर जिल्ह्यातील अनेक भागाला पुराचा फटका सोसावा लागतो. मात्र, दुष्काळी परिस्थितीच्या वेळी उजनी धरणात पाणी सोडताना नेहमीच अडचणी आणल्या जातात.

# लाठीचार्जच्या निषेधार्थ कळंब शहर कडकडीत बंद..

कळंब : मराठा आरक्षणासाठी जालना जिल्हा येथे आमरण उपोषण चालू होते. यावेळी पोलिसांनी उपोषणकर्त्यावर लाठीचार्ज केला होता. याचे पडसाद कळंब शहरात सुद्धा उमटले असून संभाजी ब्रिगेडच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करून गृहमंत्री यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे. या घटनेमुळे शनिवारी दिनांक २ सप्टेंबर रोजी कळंब शहर बंद ठेवण्यात येणार आहे. जालन्यातील अंतरवाली सराटी या गावात मराठा समाजाच्या वतीने आरक्षणासाठी उपोषण सुरू होते. शुक्रवार दिनांक १ सप्टेंबर रोजी पोलिसांसोबत बाचाबाची झाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अचानक लाठीमार सुरू केला. या घटनेमुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला आहे. याचे पडसाद राज्यभर उमटत आहेत. याचे पडसाद कळंब येथे ही उमटले, संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्त्यावर बसून रस्ता रोको आंदोलन केले. संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक अतुल गायकवाड, जिल्हाध्यक्ष ड, तानाजी चौधरी, इमरान मिर्झा विश्वजीत जाधवर, गुंडाळ आदी उपस्थित होते.

# पंढरपूर येते पांडुरंग व परिचारक परिवाराच्या वतीने केला जालना येथील आंदोलन व लाठीचार्जचा निषेध



जालना : जालना येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनात झालेल्या लाठीचार्ज या घटनेचा पंढरपुरात पांडुरंग परिवार व परिचारक गटाकडून युवा नेते प्रणव परिचारक यांच्यासह पांडुरंग परिवारातील ज्येष्ठ नेत्यासह पंढरपूर तहसील मध्ये जाऊन निवेदन देण्यात आले

ज्यांना तरी मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील घटनेचा तीव्र निषेध पडसाद राज्यात उमटत आहेत पंढरपुरामध्ये याचाही मराठा सकल समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला

त्यानंतर पांडुरंग परिवार व परिचारक गटामधून झालेल्या बैठकीमध्ये या संदर्भाचा व निषेदाचा ठराव मांडण्यात आला या ठरावास सर्वांनी मते मंजुरी देण्यात आली एकमताने प्रवच परिचारक यांच्या नेतृत्वात बाजार समिती येथे बाजार समिती चेअरमन हरीश गायकवाड पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची व्हाईस चेअरमन कैलास खुळे बाजार समितीचे उपसभापती राजू गावडे प्रशांत भैय्या देशमुख घोलप संतोष घोडके अरुण डॉक्टर सुभाष मस्के लवटे नारायण रोंगे माऊली समाधान रोंगे इत्यादी सर्व कार्यकर्त्यांनी मिळून तहसील कार्यालय मध्ये निवेदन देण्यात आले

परिचारक गटाकडून देण्यात आलेल्या निवेदनामध्ये संबंधित घटनेची चौकशी करून सकल मराठा समाजाला न्याय हक्कासाठी सरकारने आग्रही भूमिका घ्यावी संबंधित जखमी मराठा बांधवांना हार्दिक मदत करावी असे आशयाची मागणी तसेच घडलेल्या घटनेचा निषेधही करण्यात आला

# सोलापूर जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहिर करा : सुयश गायकवाड यांची मागणी



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यात पर्जन्यमान अंत्यत कमी झाल्या मुळे खरीप हंगामातील पेरण्या झाल्या नाहीत, तसेच नदी नाले तलाव आणि धरणे कोरडी ठक पडली आहेत सर्वत्र भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झाली आहे, याचा विचार करून सोलापूर जिल्ह्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करण्यात यावा आणि गावा गांमध्ये मनेरगा ची कामे सुरू करण्यात यावीत, आणि टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करण्यात यावे अशी मागणी सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस आणि रावण साम्राज्य सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष आणि युवा उद्योजक सुयश गायकवाड यांनी राज्यपाल आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे आज इमेल पाठवून केली आहेत.

राज्यातील भिषण दुष्काळी परिस्थिती ची माहिती देण्यासाठी सुयश गायकवाड यांनी आज येथे पत्रकारांशी संवाद साधला यावेळी त्यांनी सोलापूर जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावे अशी मागणी केली.

सोलापूर जिल्हयात गेल्या एक महिण्यापासुन पावसाने दडी मारल्यामुळे जिल्ह्यातील पिकांची परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान होऊन शेतकरी संकटाच्या कचाटयात सापडला होता यामुळे ह्या वर्षी शेतकऱ्यांने कर्ज काढुन पेरण्या केल्या होत्या, परंतु अद्याप पर्यंत पावसाने दडी मारल्यामुळे जिल्ह्यातील ७० टक्के पिके संपुष्टात आलेली आहेत. यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणी त सापडला आहे. तर जिल्ह्यात असलेले तलाव अद्यापही कोरडे ठक आहेत कुठेही पाणी साठा झालेला नाही त्यामुळे सर्वत्र पिण्याच्या पाण्याची आणि जनावरांना पाण्याची सोय करण्यात यावी, सोलापूर दुष्काळी कामे सुरू करण्यात यावेत जागोजागी मनेरगा योजनेतून लोकांना कामे उपलब्ध करून देण्यात यावेत, आणि सोलापूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहिर करून शेतकऱ्यांना हेक्टरी अनुदान रूपी मदत जाहिर करावे तसेच शेतकऱ्यांना अग्रमी विमा तात्काळ देण्यात यावे अशाही मागण्या त्यांनी केल्या आहेत

याप्रसंगी त्यांच्या समवेत पुष्पक निकंबे , डोळसे अजय जानराव यांच्या सह इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोरे महाविद्यालयात जिमखाना नूतन इमारतीचे ॲड ठाकरे यांचे हस्ते उद्घाटन




निफाड/प्रतिनिधी : कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय निफाड येथे जिमखाना नूतन इमारतीचे उद्घाटन म.वि.प्र.चे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे ,उपसभापती देवराम मोगल ,तालुका संचालक शिवाजी गडाख, संचालक संदीप गुळवे, निफाड शहराच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ शारदा कापसे, प्राचार्य डॉ. ए.के शिंदे, आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते, याप्रसंगी सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे म्हणाले की कर्मवीर गणपत दादा मोरे यांचे नाव दिलेल्या निफाड महाविद्यालयाला पन्नास वर्षाची मोठी परंपरा असून गणपत दादांच्या विचारांचे वृत्तीचे आपण पाईक . होऊन तालुका व परिसरातील विद्यार्थी व पालक सभासदांच्या गरज मागणीनुसार विद्यापीठांच्या नियमांचा सखोल अभ्यास करून एका मोठ्या कोर्सच्या अंतर्गत निफाड या ठिकाणी नवीन महाविद्यालयाची उभारणी करणार असल्याचे यावेळी त्यांनी आश्वासन दिले.कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती बाळासाहेब क्षिरसागर यांनी यावेळी महाविद्यालयाच्या वर्षभरातील उल्लेखनीय बाबींचा आढावा घेत प्रलंबित कामांविषयी उपस्थितांचे लक्ष वेधले. प्राचार्य डॉ. ए.के शिंदे यांच्या नेतृत्वाचे क्षीरसागर यांनी कौतुक केले,

याप्रसंगी डॉ. शिंदे डॉ.उत्तम डेरले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. असून डॉ.सौ सीमा डेरले, सुधाकर कापसे, यांनी प्रत्येकी विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून अकरा हजार रु. धनादेश सरचिटणीस ठाकरे यांचे कडे सुपूर्त केला. असून रवींद्र बोरगुडे, विशाल पगारे, यांनी ना नफा ना तोटा या तत्त्वावर महाविद्यालयाचे काम करून मोलाचे सहकार्य केले.

याप्रसंगी सोसायटीचे चेअरमन भाऊसाहेब कापसे व महा. विकास समितीचे तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते क्रीडा संचालक प्रा. चेतन कुंदे, एनसीसी अधिकारी प्रा. एस बी गायकवाड, प्रा. अभय वडघुले व सर्व प्राध्यापक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेश बनकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार चेतन कुंदे यांनी मानले या कार्यक्रमासाठी सभासद ग्रामस्थ सर्व प्राध्यापक. सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रुक्मिणी विद्यापीठात मंगळागौर स्पर्धेचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधीः चला सखी नो चला जेवण पुष्प उजळायला चला पंढरीतील रुक्मिणी विद्यापीठ हे समाज परिवर्तनासाठी स्त्री शिक्षण हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून संस्था सतत सन १९९२ पासून महिलांसाठी विविध कार्यक्रम राबवत असते महिलांना आनंदी जीवन जगता यावे व सतत घर कामात असणाऱ्या महिलांना मंगळागौरीच्या निमित्ताने आपल्या मैत्रिणीबरोबर खेळण्याचा व त्यांच्याशी गप्पा मारण्याचा आनंद घेता यावा तसेच मनाला चपळता व चैतन्य मिळावी या उद्देशाने संस्था सचिव सौ सुनेत्रा ताई पवार यांच्या नेतृत्वाखाली शनिवार दिनांक ०९/९/२०२३ रोजी दुपारी दोन वाजता रुक्मिणी विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये श्रावण सरी या कार्यक्रमाचे मंगळागौरी खेळतील स्पर्धेचे आयोजन केलेले आहे यामध्ये प्रथम क्रमांक. र१००००/ द्वितीय क्रमांक र७०००/




# शासनाच्या ज्या काही योजना आहेत त्या समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी गावातील प्रत्येक युवकांनी प्रयत्न केला पाहिजे : रोहन परिचारक



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्याचे मा. आमदार प्रशांतराव परिचारक साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पंढरपूर तालुका पंचायत राज व ग्राम विकास विभाग यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य इमारत व बांधकाम कामगार महामंडळ नाव नोंदणी सेवा पंधरवाडा शिबिराच्या आयोजनानिमित्त शेवते येथील कार्यक्रमात युटोपियन शुगरचे एमडी आदरणीय रोहनजी परिचारक साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गावातील प्रत्येक युवकांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून व राज्य सरकारचे माध्यमातून ज्या काही कल्याणकारी योजना आहेत या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी गावातील प्रत्येक युवकांनी प्रयत्न केला पाहिजे असे आवाहन केले. तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेची प्रतिमा व श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेच्या पूजनाने सुरुवात केली श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक मालक यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये शेतकरी शेतमजूर कामगार हा सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून नेहमीच विकासाचे काम करुन या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम केलेले आहे व श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक मालक यांचाच वसा घेऊन आदरणीय प्रशांतरावजी परिचारक सर्वसामान्यांसाठी काम करीत आहेत व त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा जो स्तुत्य उपक्रम संपूर्ण तालुक्यामध्ये सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने राबवल्याबद्दल आयोजक मनोज पवार व भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग व त्यांच्या सर्व टीमचे आदरणीय रोहनजी परिचारक यांनी आभार मानले व गावातील जास्तीत जास्त कामगारांनी आपली नोंदणी करून घ्यावी व या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष कुलकर्णी, बाळासाहेब माळी, सोपान पाटील, महादेव यारनाळे, पांडुरंग धोत्रे, अरुण पाटील, भारत पाटील ,बाळासाहेब पाटील, राहुल पाटील, हनुमंत येलपले, शेवते येथील सर्व ग्रामस्थ व भारतीय जनता पार्टी पंचायत राज व ग्राम विकास विभागाचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# हुलजंती येथील पंचक्रोशीतील हजारो महिलानी अभिजीत पाटील यांना बांधली राखी

*** भाऊराया अभिजीत पाटील यांनी केले अवाहन महिलांसाठी सक्षमीकरणासाठी लघुउद्योगात प्रत्येकाने पुढे यावे**

*** सुखात एक पाऊल मागे तर दु:खात एक पाऊल पुढे असेल अशी अभिजीत पाटील यांची ग्वाही**



पंढरपूर/प्रतिनिधी : गेल्या काही दिवसांमध्येच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी चेअरमन अभिजीत पाटील यांना राखी बांधली होती. रक्षाबंधनानिमित्त अभिजीत पाटलांना मंगळवेढ्यातील हुलजंती येथे हजारों व माता-भगिनीं व बहिणीनी एकत्र येऊन अभिजीत पाटील यांना राखी बांधली.

हुलजंती सरपंच मिनाक्षीताई कुरमुले, सारिका सलगर, शितल बोरकडे, साधना आठवले, स्वाती पेटरे, जिजाबाई बाबर, संध्याराणी बोरकडे, स्वाती बर्डे, सोनाली कुंभार, स्वाती पेट्टरगे, सुमित्रा निगडी, ज्योती सोभुर्ते, कविता मेत्रे आदी महिलांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. अभिजीत पाटील यांनी हुलजंती येथील महालिंगरायाचे दर्शन घेतले.व समस्त हुलजंती पंचक्रोशीतील व देवस्थान ट्रस्टच्या वतीने अभिजीत पाटील यांचे नागरी स्वागत करून करण्यात आले. पाटील यांनी पंढरपूर मंगळवेढा मतदार संघात २०२४ ची निवडणूकीत उतरणार असल्याने जोरदार तयारी सुरू केली आहे.. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील हे मंगळवेढा येथील अनेक गाव वाडीवस्तीवर गाव भेट देत आहेत. लहानापासून थोरापर्यंत आणि महीलामध्ये हि आपली माणुसकी जपली होती. त्यामुळेच त्यांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली होती. त्याच धर्तीवर सध्या विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपली लोकप्रियता विविध स्थरातून वाढत असल्याचे स्पष्टपणे जाणवू लागले आहे.